बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

मूल्य २.००

# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३८ ■ गुरूवार १० सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live® Delightful delicacies! SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

## दुष्काळी स्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या शक्तीपीठ सारखे विषय थांबवा : विजय वडेट्टीवार

**मुंबई, दि. ९ : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने दडी मारल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक तालुक्यांमध्ये मागील पस्तीस ते चाळीस दिवसांपासून पाऊस झालेला नाही. राज्यातील एकोणावीस जिल्ह्यातील ८३ तालुके दुष्काळी स्थितीला सामोरे जात आहेत. खरीप पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे सरकारने शक्तीपीठ महामार्गासह इतर विषय बाजूला ठेवून सध्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाला प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.**



काँग्रेस नेते वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात पावसाअभावी अनेक जिल्ह्यांमध्ये पिकांची परिस्थिती गंभीर आहे. सरकारने तातडीने पंचनामे करून पीक विम्यातून शेतकऱ्यांना किती मदत मिळणार आणि सरकारकडून किती आर्थिक मदत दिली जाणार, हे स्पष्ट करावे. एकीकडे सरकारकडून मोठ्या पायाभूत प्रकल्पांच्या घोषणा केल्या जात आहेत. मात्र, सध्या शेतकरी संकटात असल्याने प्रकल्प उभारणीपेक्षा शेतकऱ्यांना मदत करण्याला प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपण लवकरच राज्यपालांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**आरक्षणात फसवी भूमिका**

मराठा आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावरही वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली. दोन्ही समाजांना सरकारकडून खेळवले जात आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारची भूमिका संदिग्ध आणि फसवी असल्याचा आरोप त्यांनी केला. संविधानाच्या चौकटीत आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी सरकारची आहे. एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजाचे आरक्षण किंवा हक्क हिरावले जाणार नाहीत, याची सरकारने हमी द्यावी. आरक्षणाबाबतचा निर्णय आंदोलनाच्या दबावातून नव्हे, तर संविधानाच्या चौकटीतून घेतला पाहिजे, असे मत वडेट्टीवार यांनी व्यक्त केले. सरकार कोणाच्या दबावापुढे झुकत असेल तर त्याचा फटका **(पान ४ वर)**

## एमपीएससीची विद्यार्थ्याची पुण्यात आत्महत्या

पुणे, दि. ९ : शैक्षणिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रथमेश देशमुख या तरुणाचा मृत्यू झाला आहे. प्रथमेश हा मुळचा धाराशिव जिल्ह्यातील परंडा येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. त्याच्यावर सुमारे अडीच लाख रुपयांचे कर्ज असून, आर्थिक अडचणींमुळे त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचा पोलिसांचा प्राथमिक संशय आहे.

दरम्यान, राज्यातील विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेच्या पेपरफुटीच्या आरोपानंतर विद्यार्थ्यांनी यापुर्वीच आंदोलन **(पान ४ वर)**

## चौतीस ग्रा.पं.चे सरपंचपद महिलांसाठी राखीव शिरपुरातील चारही संवर्गातील आरक्षण जाहीर

**शिरपूर दि.९ (का.प्र.)- तालुक्यातील पेसा व्यतिरिक्त असलेल्या ६८ ग्रामपंचायतींपैकी ३४ ग्रामपंचायतीचे सरपंचपद महिलांसाठी राखीव करण्यात आले.**

२०२५-२०३० या कालावधीसाठी सरपंच आरक्षण निश्चितीची विशेष सभा नऊ सप्टेंबरला तहसील कार्यालयात पार पडली. प्रांताधिकारी डॉ. शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी आणि नायब तहसीलदार श्रीमती पंकज मगर उपस्थित होते. कार्तिक कोळी या बालकाच्या हस्ते सोडत काढण्यात आली. त्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र) आणि सर्वसाधारण अशा चारही संवर्गातील आरक्षण जाहीर करण्यात आले.

प्रवर्ग निहाय आरक्षणात अनुसूचित जाती : आरक्षित गावे: भोरटेक, रुदावली, अंतुर्ली, अर्थे बु. महिलांसाठी राखीव: रुदावली, अंतुर्ली.

अनुसूचित जमाती : आरक्षित गावे: थाळनेर, टेकवाडे, अर्थे खु., होळ, वाघाडी, बभळाज, मांजर, भटाणे, विखरण बु., अजनाड, गिधाडे, जापोरा, वनावल, टेंभे बु. महिलांसाठी राखीव: अजनाड, अर्थे खु., गिधाडे, टेकवाडे, भटाणे, वाघाडी, बभळाज. नागरिकांचा मागास प्रवर्ग : आरक्षित गावे: अहिल्यापूर, चांदपूरी, नवे भामपूर, सुभाषनगर, आढे, पिळोदे, साकवद, वरुळ, आमोदा, बलकुवे-मुखेड, बोरगांव, नांथे, मांजरोद, कळमसरे, कुवे, शिंगावे. महिलांसाठी राखीव: आढे, पिळोदे, कुवे, नांथे, बलकुवे-मुखेड, वरुळ, साकवद, आमोदा. सर्वसाधारण : आरक्षित गावे: सावळदे, भोरखेडा, लोंढरे, ताजपुरी, करवंद, उंटावद, अजंदे खु., बाभुळदे, जवखेडा, अजंदे बु., गरताड, वाठोडे, तरडी, खर्दे खु.पाथर्डे, घोडसगांव, दहिवद, भाटपुरा, मांडळ, खामखेडा प्र.था., असली तांडे, जुने भामपूर, कुरखळी, जातोडे, पिंपळे, सावेर गोदी, भरवाडे, तऱ्हाडी त.त., पिंप्री, जैतपूर, उप्परपिंड, खर्दे बु., हिंगोणी बु., बाळदे, तोंदे. महिलांसाठी राखीव: पिंप्री, सावेर गोदी, जैतपूर, भोरखेडा, वाठोडे, सावळदे, उप्परपिंड, खर्डे बु., तोंदे, हिंगोणी बु., करवंद, खामखेडा प्र.था., गरताड, घोडसगांव, जवखेडा, जातोडे, मांडळ.आदि ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

## हिरे वैदयकीय महाविद्यालय व जिल्हा रूग्णालयात बंद यंत्रसामुग्री; रूग्णांची गैरसोय थांबवा- काँग्रेस

**धुळे, दि.९- श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रूग्णालयाच्या ढिसाळ कारभारामुळे यंत्रसामुग्री बंद पडली आहे. यामुळे रूग्णांची मोठ्याप्रमाणावर होणारी गैरसोय थांबवण्यात यावी. या मागणीचे निवेदन काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी अधिष्ठाता यांना देण्यात आले.**




निवेदनात नमुद केले आहे की, हिरे वैद्यकीय महाविद्यालयात विविध योजनांचा बोजवारा उडालेला आहे. रूग्णालयातील अनागोंदी कारभारामुळे जनता त्रस्त झाली आहे. उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांच्या रक्त चाचण्या तसेच इतर सर्व चाचण्या, तपासण्या मोफत असणे बंधनकारक असतांना जिल्हा रूग्णालयात पैसे घेतले जात आहेत. रूग्णालयातील नाक, कान, घसा विभागात उपचारासाठी आवश्यक असणारे मशिन दोन वर्षांपासून बंद आहे. यामुळे रूग्णांना छत्रपती संभाजी नगर येथे उपचारासाठी जावे लागत आहे. दोन वर्ष उलटले तरी मशिन दुरूस्त करण्यात **(पान ४ वर)**

## पालकमंत्री हसन मुश्रीफ नंदुरबार जिल्हा दौऱ्यावर

नंदुरबार, ९ (प्रतिनिधी)- राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ हे गुरुवार, दि. १० सप्टेंबर, २०२६ रोजी नंदुरबार जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

गुरुवार १० सप्टेंबर रोजी सकाळी ७.१५ वाजता नंदुरबार रेल्वे स्थानक येथे आगमन झाल्यानंतर मोटारीने सकाळी ७.३० वाजता नंदुरबार येथील शासकीय विश्रामगृहात त्यांचे आगमन होईल. सकाळी १०.०० वाजता रंगावली सभागृह,जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे पर्जन्यमान, पीक परिस्थिती, पिण्याचे पाणी, गणेश उत्सवाबाबत प्रशासनाच्या तयारीबाबत **(पान ४ वर)**

## सकल मराठा समाजातर्फे ना.विखे पाटलांच्या वक्तव्याचा निषेध करत रास्ता रोको आंदोलन

**धुळे, दि.९- शहरातील संतोषी माता चौकात सकल मराठा समाज, धुळे तर्फे सरकारमधील मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यात येवून संतोषी माता चौक, धुळे येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले.**



मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वक्तव्य केले की, आता मराठा समाज संदर्भात मनोज जरांगे पाटील यांच्याशी कुठलीही चर्चा करण्यात येणार नाही. या वक्तव्याचा जाहीर निषेध म्हणून रस्ता रोको करण्यात आला. सरकारने वेळोवेळी फक्त आश्वासने देऊन मराठा समाजाची दिशाभूल केली. परंतु आजपर्यंत मराठा आरक्षणाबाबत कुठलीही ठोस कार्यवाही केली नाही. तरी भविष्यात लवकरात लवकर मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार कार्यवाही न झाल्यास सकल मराठा समाज संपूर्ण अधिक तीव्र आंदोलन करून महाराष्ट्रात चक्काजाम करेल व यास सर्वस्वी सरकार जबाबदार राहील. सदरील चक्का जाम **(पान ४ वर)**

## महिलांनी समुपदेशन केंद्राचा लाभ घ्यावा

शहादा,दि.८(प्रतिनिधी)- कौटुंबिक हिंसाचार, मानसिक त्रास, छळ किंवा इतर कोणत्याही अडचणीत असलेल्या शहादा तालुक्यातील महिलांना मोफत समुपदेशन, कायदेशीर मार्गदर्शन व मदत मिळावी यासाठी राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत शहादा पोलिस स्टेशन (जुनी इमारत) आवारात महिला समुपदेशन केंद्र स्थापन करण्यात आले आहे.शहादा तालुक्यातील अन्यायग्रस्त पीडित महिलांनी न घाबरता या केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन समुपदेशन केंद्राच्या समुपदेशक आरती शिंदे व अर्चना पावरा यांनी केले आहे.

सदर महिला **(पान ४ वर)**

## नंदुरबारला ना.उदय सामंतांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन

**नंदुरबार, दि.९(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला चालना देण्यासह जिल्ह्यातील गुंतवणुकीच्या संधी वाढविणे, नवीन उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा) निलेश गायकवाड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.**

या परिषदेस नंदुरबार जिल्ह्यातील गुंतवणूकदार, उद्योजक तसेच औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. परिषदेत जिल्ह्यातील विविध गुंतवणूकदारासोबत सुमारे १५० ते २०० सामंजस्य करार करण्यात येणार आहेत. तसेच, सायंकाळी ४.३० वाजता उद्योजकांसाठी बिरसा मुंडा सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, **(पान ४ वर)**

## शहाद्यात शहीद लालदास देसाई व अब्दुल हमीद यांना अभिवादन

**शहादा,दि.०९(का.प्र.)- वंदे मातरम आणि भारत माता की जयच्या जयघोषात आज शहादा शहरातील हुतात्मा व शहीद स्मारकांवर नागरिकांनी पुष्पवृष्टी करत शहिदांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हिंदू-मुस्लिम बांधवांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी राष्ट्र सेवा दलाच्या वतीने सकाळी नऊ वाजता शहरातील विविध शहीद स्मृतिस्थळांवर अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



दि.९ सप्टेंबर रोजी नंदुरबार येथे चले जाव चळवळी दरम्यान इंग्रजांविरोधात काढलेल्या मोर्चात बालशहीद लालदास देसाई इंग्रजांच्या गोळीबारात हुतात्मा झाले होते. या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून शहादा येथील हुतात्मा लालदास देसाई चौकात व शहीद अब्दुल हमीद चौकात मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीत व वंदे मातरम्‌चे गायन करून भारत माता की जयच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.या प्रसंगी राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष प्रा. आर.टी. पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, स्वातंत्र्य सैनिकांनी, वीर शहिदांनी आणि **(पान ४ वर)**

## ज्वारीच्या शेतातील त्र्याणव लाखांचा गांजा एल.सी.बी.चे हेमंत पाटलांनी केला जप्त

**नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी)- आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अवैध दारूची वाहतूक व साठा, अवैध अग्निशस्त्रे तसेच अंमली पदार्थांची लागवड व विक्रीविरोधात प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने धडगाव तालुक्यातील गेंदा गावाच्या शेतशिवारात कारवाई करून ९३ लाख ०६ हजार रुपये किमतीची १८६ किलो गांजाची झाडे जप्त केली.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व धडगाव पोलीस ठाणे हद्दीतील गेंदा गावाच्या शेतशिवारात एका इसमाने ज्वारीच्या पिकामध्ये आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीररित्या गांजाची लागवड केल्याची माहितीची खात्री झाल्यानंतर पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी तातडीने पथक तयार करून कारवाईचे आदेश दिले. पथकाने गेंदा गावातील शेतशिवारात ज्वारीच्या पिकाची पाहणी केली असता ज्वारीच्या अंतरपिकात गांजाची झाडे आढळून आली. या कारवाईत एकूण १८६ किलो गांजाची झाडे, अंदाजे ९३ लाख ०६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून जप्त करण्यात आला. या प्रकरणी निर्मल वनकर पावरा, रा. गेंदा, पोस्ट चिखली, ता. धडगाव, जि. नंदुरबार याच्याविरुद्ध धडगाव पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप व अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, महेश निकम, विकास गुंजाळ, पोलीस हवालदार सजन वाघ, योगेंद्र सोनार, दादाभाऊ वाघ, ज्ञानेश्वर पाटील, स्वप्नील गोसावी, दत्तात्रय बागल, सचिन वसावे, पोलीस अंमलदार यशोदीप ओगले, **(पान ४ वर)**

## नगरसेविकेच्या मुलावर हल्ला करणाऱ्या चार संशयीतांविरुद्ध अखेर गुन्हा दाखल

**धुळे, दि.९- गाडी नीट चालविता येत नाही का, अशी विचारणा केल्यावरुन नगरसेविका कल्याणी अंपळकर यांच्या मुलाला तीन ते चार जणांनी मारहाण केली. गावठी कट्ट्याचा धाक दाखवून, सुरा, चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची घटना शहरातील मनोहर चित्रपट गृहाजवळ घडली.**

याप्रकरणी आझादनगर पोलिस ठाण्यात चौघां संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

सुहास सतीश अंपळकर (२५, रा. मारोती नगर, चाळीसगाव चौफुली, धुळे) असे जखमी तरुणाचे नाव आहे. सात सप्टेंबरला रात्री साडेनऊच्या सुमारास चाळीसगाव चौफुली येथील साखला पान सेंटर आणि जुना आग्रा रोडवरील मनोहर चित्रपट गृहासमोर घडला.

गाडी नीट चालविता येत नाही का, अशी विचारणा सुहासने मारहाण करणाऱ्यांपैकी एकाला केली. त्यावरून संशयितांनी सुहासला अडविले, मोटारसायकलच्या डिकीतून गावठी कट्टा काढून धाक दाखविला. त्यानंतर सुरा काढून सुहास अंपळकर याच्यावर वार केला, त्याच्या पोट व हाताला गंभीर दुखापत होऊन रक्तबंबाळ झाला. शिवीगाळ, दमदाटी सुहासच्या गळ्यातील सुमारे पाच तोळ्याची सोन्याची ओढून नेण्याचा प्रयतक केला. परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धावून आल्याने हल्लेखोरांच्या तावडीतून सुहास अंपळकर याची सुटका केली. आझाद नगर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळावरून गावठी कट्टा, सुरा चाकू जप्त केला.

याप्रकरणी आझाद नगर पोलीस ठाण्यात सतीश अंपळकर याने दिलेल्या फिर्यादीनुसार, उदय परशुराम परदेशी, त्याचा जुळा भाऊ कुणाल परशुराम परदेशी, कुणाल रवींद्र उर्फ बाळू घाटोळे, जय युवराज परदेशी (सर्व रा. पवन नगर, धुळे) यांच्याविरुद्ध आझादनगर पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयतक केल्याचा गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक महेश घायतड तपास करीत आहेत.

**शहरात तणाव - चर्चा**

मारहाण **(पान ४ वर)**

## प्रीती मोरेंना तापी-पूर्णा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर



धुळे, दि.९- येथील कवयित्री, लेखिका, उद्योजिका, समाजसेविका तथा निवेदिका प्रीती नंदलाल मोरे यांना तापी-पूर्णा राष्ट्रीय उत्कृष्ट वक्ता/निवेदक पुरस्कार जाहीर झाला आहे. शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन, मुक्ताईनगर, जि. जळगाव यांच्या वतीने आयोजित चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन दि.३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज साहित्य नगरी, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक **(पान ४ वर)**

### रुग्णांशी थेट संवाद साधत सुविधांची पाहणी

## रुग्णसेवेत औषधे, स्वच्छता, दर्जेदार आहाराला प्राधान्य द्यावे- जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

**धुळे, दि.९- रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला आवश्यक औषधे पुरेशा प्रमाणात व वेळेवर उपलब्ध झाली पाहिजेत. आवश्यक सर्व चाचण्या रुग्णालयातच व्हाव्यात. रुग्णालयातील कक्ष, परिसर व स्वच्छतागृहे नियमितपणे स्वच्छ ठेवावीत. तसेच रुग्णांना स्वच्छ, पौष्टिक व दर्जेदार आहार वेळेवर उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या.**



जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी आज दुपारच्या सत्रात श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे अचानक भेट देऊन रुग्णसेवा व उपलब्ध सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी **(पान ४ वर)**

## दिल्लीचे माजी मुख्य सचिव राकेश मेहतांची आत्महत्या

नवी दिल्ली, दि. ९ : दिल्लीचे माजी मुख्य सचिव आणि १९७५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी राकेश मेहता (वय ७४) यांचा नोएडा येथील सेक्टर ८२ मधील निवासस्थानी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, त्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घटनेच्या वेळी मेहता यांच्या पतकी सुमंती मेहता मुलाला भेटण्यासाठी डेहराडून येथे गेल्या होत्या. राकेश मेहता फोनला प्रतिसाद देत नसल्याने त्यांच्या पत्नीला संशय आला. त्यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिल्यानंतर सहा सप्टेंबरला डायल-११२ वरून पोलिसांना घटनेची माहिती मिळाली.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,41,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,40,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## टोल प्लाजा प्रशासन टोल वसुलीत मग्न रस्ता दुरुस्तीकडे लक्ष देण्याची मागणी

**सोनगीर दि. ९ (प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा महामार्गाला लागून असलेल्या सोनगीर-दोंडाईचा रस्त्याच्या कडेला पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या भूमिगत (अंडरग्राउंड) ड्रेनेजचे पाईप दोन ठिकाणी फुटल्याने मोठे खड्डे पडले आहेत. तसेच सोनगीर फाट्याकडून गावात जाणारा आणि गावातून फाट्याकडे येणारा (पूर्व बाजूचा) सर्विस रस्ता पूर्णपणे उखडला असून, टोल वसूल करणाऱ्या संबंधित कंपनीने याच्या देखभाल-दुरुस्तीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.**

सोनगीर टोल नाक्याकडून फाट्याकडे येणाऱ्या सोनगीर-दोंडाईचा सर्विस रोडच्या कडेला पावसाचे पाणी निघून जाण्यासाठी भूमिगत ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. मात्र, योग्य देखभालीअभावी या ड्रेनेजचे पाईप दोन ठिकाणी फुटून मोठे खड्डे पडले आहेत. महामार्गावरून वेगाने जाणारी-येणारी वाहने आणि स्थानिक रहिवाशांसाठी हे खड्डे अत्यंत धोकेदायक ठरत आहेत. सोनगीर फाट्यावरील स्थानिक हॉटेल व्यावसायिक व नागरिकांनी या खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांची शक्यता लक्षात घेऊन टोल कंपनीच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे वारंवार लेखी व तोंडी स्वरूपात तक्रारी केल्या आहेत. परंतु, अधिकाऱ्यांकडून केवळ टोलवाटोलवी आणि टाळाटाळ केली जात आहे. अद्याप हे खड्डे बुजवण्यात आलेले नाहीत. प्रशासनाच्या या बेफिकीर वृत्तीमुळे येथे एखादे प्रवासी वाहन उलटून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सोनगीर गावाकडे येणाऱ्या व जाणाऱ्या पूर्व-पश्चिम दोन्ही बाजूंच्या सर्विस रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्यांच्या साईड पट्ट्या अत्यंत खोल गेल्याने मुख्य रस्त्यावरून वाहन खाली **(पान ४ वर)**

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग;गुन्हा दाखल

शिरपूर दि.९ (का.प्र.)- चिकन घेण्यासाठी आलेल्या अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन करुन तिचा विनयभंग केल्याची घटना तालुक्यातील कुत्र्यापाडा गावात सात सप्टेंबरला घडली होती. याप्रकरणी पीडीत मुलीने दिलेल्या फिर्यादीवरुन संशयित वाहिद अब्बास खाटीक (वय २७, रा.वरला जि.बडवानी, मध्यप्रदेश) याच्याविरोधात सांगवी येथील तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. डीवायएसपी सुधीर पाटील तपास करीत आहेत. अल्पवयीन मुलींचा अशा पध्दतीने विनयभंग होत असल्यामुळे सर्वसामान्य पालकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

## कर्णकर्कश डीजे आणि तीव्र लेझर लाईट्स पासून सावध राहा- आयएमए चे आवाहन

**मुंबई,दि.९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रभरात विविध सण, उत्सव, धार्मिक मिरवणुका, विवाह समारंभ आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मोठ्या आवाजातील डीजे आणि तीव्र क्षमतेच्या लेझर लाईट्सचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. या पार्श्वभूमीवर, उत्सवाचा आनंद घेताना नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य ने प्रसिद्धीपत्रकाद्वारे नागरिक तसेच आयोजकांना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.**

मोठ्या आवाजामुळे कानात सतत आवाज येणे, ऐकण्याची क्षमता कमी होणे, कान दुखणे, डोकेदुखी, चक्कर येणे, झोपेचा त्रास, चिडचिड आणि मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. मोठ्या आवाजाच्या वारंवार किंवा दीर्घकाळ संपर्कात राहिल्यास कायमस्वरूपी ऐकण्याची क्षमता जाण्याचा धोका असतो. लहान मुले आणि किशोरवयीन मुलांच्या श्रवणक्षमतेवर, झोपेवर, एकाग्रतेवर आणि वर्तनावर मोठ्या आवाजाचा गंभीर परिणाम होतो. आजारी व्यक्ती, हृदयविकार, उच्च रक्तदाब असलेल्यांनी अशा अतितीव्र आवाजापासून शक्य तितके दूर राहावे. तीव्र लेझर किरण थेट डोळ्यांवर पडल्याने डोळ्यांची जळजळ, पाणी येणे, दृष्टिक्षमता धूसर होणे असे त्रास होतात. गंभीर परिस्थितीत रेटीनाला इजा होऊन कायमस्वरूपी अंधत्व येऊ शकते. त्यामुळे प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या दिशेने लेझर सोडणे टाळावे. वेगाने चमकणाऱ्या फ्लॅशिंग किंवा स्ट्रोब लाईट्समुळे संवेदनशील व्यक्तींमध्ये मायग्रेन, अस्वस्थता तसेच फोटोसेन्सिटिव्ह सिझर्स म्हणजे **(पान ४ वर)**

# आपला महाराष्ट्र

## बालकांच्या हौतात्म्याचे विस्मरण होऊ नये

नंदनगरीतील बाल हुतात्मे शिरिष कुमार, लालदास, धनसुखलाल, शशिधर केतकर, घनश्याम दास यांचा स्मृतिदिन काल साजरा झाला.या बालकांनी ९ सप्टेंबर १९४२ रोजी खांद्यावर तिरंगा घेऊन भव्य मिरवणूक काढली होती.ही मिरवणूक ९ ऑगस्ट १९४२ घ्या चलेजाव चळवळीची स्मृती जागविण्यासाठी काढण्यात आली होती.ज्येष्ठांची त्यांना साथ होती.तहशील कार्यालयावर मिरवणूक निघाली असता शिरिष कुमार नेतृत्व करीत होता.ही मिरवणूक ब्रिटिश पोलिसांनी अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु विद्यार्थ्यांनी ऐकले नाही मिरवणूकीची आगेकूच सुरूच होती म्हणून पोलिसांनी बालकांवर गोळीबार केला. त्यात पाच बालके हुतात्मा झाली.देशाच्या स्वातंत्र्याचा जयघोष करताना त्यांनी मरण पत्करले.संपूर्ण देशभर ही वार्ता पसरली आणि देशवासीयांचा उर अभिमानाने भरून आला.या बालकांचे हौतात्म्य चिरंतन रहावे यासाठी साने गुरुजींनी पुढाकार घेऊन नंदुरबारच्या जनतेला आवाहन केले. जनतेने प्रतिसाद देत सक्रिय मदत केली आणि हुतात्मा स्मारक निर्माण झाले. तेव्हापासून आजतागायत येथे बाल शहिदांची स्मृती जागविली जाते. नंदुरबारच्या सुबुद्ध नागरिकांनी एकत्र येत शहीद स्मृती नावाची संस्था स्थापन केली. त्यात ॲड.रमणलाल शहा, प्रा.डॉ.पीतांबर सरोदे, शाहीर हरिभाऊ, पांडुरंग माळी आदी अनेकांचा समावेश होता.त्यांनी या संस्थेच्या वतीने सातत्याने कार्यक्रमांचे आयोजन केले.महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांनी नंदुरबारला येऊन व्याख्याने दिली.नव्या पिढीचे प्रबोधन केले.निरनिराळे उपक्रम राबवून शहिदांच्या स्मृती कायम ठेवल्या. ही परंपरा आता नव्या पिढीच्या हाती आहे.

पूर्वी अखंड धुळे जिल्हा अस्तित्वात असताना त्या जिल्ह्याच्या अभिमानाचा हा भाग होता.आता नंदुरबार जिल्ह्याच्या अभिमानाचा तो मुद्दा झाला आहे.धुळे जिल्ह्यातील चिमठाणा येथे लुटलेल्या खजिन्याचा इतिहास या जिल्ह्याच्या वाट्याला आला आहे.वास्तविक दोन्ही घटना देशाच्या पातळीवरच्या असून त्यांना प्रादेशिक चौकटीत बांधून ठेवता येणार नाही.मात्र दुर्दैवाने तसे झालेले आहे.नंदुरबारकरच फक्त शिरिष कुमारच्या हौतात्म्याची आठवण करतात.धुळे जिल्ह्यात त्या संबंधी काहीच होत नाही.तर चिमठाणे खजिना लुटीच्या जागेवर जाऊन एक जागरूक गट दरवर्षी त्या स्मृती जागवितो. हा खजिना सातारच्या व धुळे जिल्ह्यातील क्रातिकारकांनी १४ एप्रिल १९४४ रोजी लुटला होता.पाच लाखांचा हा खजिना स्वातंत्र्याच्या आंदोलनासाठी वापरण्यात आला होता.बापूसाहेब रावल यांनी पुढाकार घेत चिमठाण्याजवळ लुटीच्या स्मरणार्थ स्मारक उभे केले.तिथे होणारा कार्यक्रम वगळता इतरत्र एकही कार्यक्रम होत नाही.परिणामी पुढच्या पिढ्यांना हा इतिहास कळण्याची शक्यता कमीच दिसते.तसेच बाल शहिदांच्या संदर्भात होऊ शकते.वास्तविक संपूर्ण खान्देशात आणि राज्यात हुतात्म्यांच्या बलिदानाचा जागर झाला पाहिजे.त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेत आम्ही आमची पुढची वाटचाल केली पाहिजे.खान्देशातील आदिवासी स्वातंत्र्य वीरांचा देखील मोठा इतिहास आहे. रावलापाणी येथे झालेला उठाव असेल किंवा अन्य ठिकाणचे उठाव असतील त्यांचे विस्मरण होता कामा नये.भिल्लांच्या उठावाची दखल खुद्द इंग्रजांनी घेतली होती. त्या संबंधीचा मोठा पत्रव्यवहार येथील इंग्रज अधिकाऱ्यांनी थेट व्हिक्टोरियांशी केलेला उपलब्ध आहे.यातून भिल्ल रेजिमेंटची स्थापना ब्रिटिशांनी केली.बंड मोडून काढण्यासाठी लष्कर भरती सुरू केली.१६ ठिकाणी संस्थाने निर्माण करून उठाव शमविण्यासाठी ब्रिटिशांनी मोहिमच आखली होती.एवढा मोठा हा इतिहास आहे.पण तो विसरला जातोय.

साने गुरूजींचे स्मारक अमळनेरला जनतेच्या सहभागातून उभे करण्याचा प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू आहे.या स्मारकाचा उद्देशच शिक्षण,प्रशिक्षण,संस्कार,प्रबोधन,शेती आणि शेतकरी,महिला यांच्या वैचारिक आणि भौतिक विकासासाठी व्हावा असा प्रयत्न आहे.गुरूजींनी खान्देशात जसे स्वातंत्र्याच्या आंदोलनाला बळ दिले तसेच शहिदांच्या स्मारकासाठीही प्रयतक केले.तो ठेवा जपून ठेवण्याची जबाबदारी खान्देशवासीयांची आहे. नंदुरबारच्या मिरवणुकीत पी.के.अण्णा पाटील,लोक मित्र भाई मदाने, विश्वनाथ वावदे,मोठाभाऊ मराठे होते.त्यांच्यावर पोलीस अधिकाऱ्याच्या खुनाचा प्रयतक केल्याचा आरोप होता.त्या आरोपाखाली ते धुळ्याच्या तुरूंगात होते.हा इतिहास अनेकांना माहिती नाही.तो पुढच्या पिढीपर्यंत पोहचला पाहिजे. देशभर चले जाव आंदोलनाची धग पेटलेली होती. ९ ऑगस्टला महात्मा गांधींनी दिलेल्या करेंगे या मरेंगेच्या आवाहनाने देशातील सामान्य माणसाच्या मनात स्वातंत्र्याची आस अधिक तीव्र झाली होती. त्या आंदोलनाची स्मृती जागवण्यासाठी नंदुरबारमध्ये विद्यार्थ्यांनी मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला.ही साधी मिरवणूक नव्हती. तिच्या हातात शस्त्रे नव्हती, तिच्यामागे कोणतेही सैन्य नव्हते. होती ती तिरंगा घेऊन चालणारी बालपावले आणि स्वातंत्र्याचा जयघोष करणारा कोवळा आवाज.

या मिरवणुकीच्या अग्रभागी होता बालक शिरीषकुमार. त्याच्यासोबत लालदास, धनसुखलाल, शशिधर केतकर, घनश्यामदास आणि अनेक विद्यार्थी होते. ज्येष्ठ स्वातंत्र्यप्रेमींचीही त्यांना साथ होती. नंदुरबारच्या रस्त्यांवरून मिरवणूक पुढे सरकत होती. खांद्यावर तिरंगा होता. मनात स्वातंत्र्याचे स्वप्न होते. ओठांवर देशभक्तीच्या घोषणा होत्या. ब्रिटिश राजवटीच्या दडपशाहीला न घाबरता ही मुले पुढे चालली होती.मिरवणुकीचे लक्ष्य होते तहसील कार्यालय. ब्रिटिश सत्तेच्या दृष्टीने हा केवळ विद्यार्थ्यांचा मोर्चा नव्हता. तिरंगा घेऊन ब्रिटिश सत्तेच्या कार्यालयाकडे जाणे म्हणजे त्या सत्तेला दिलेले उघड आव्हान होते. त्यामुळे पोलिसांनी मिरवणूक अडवण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी विद्यार्थ्यांना थांबवले.पण विद्यार्थी थांबले नाहीत.दडपशाहीसमोर झुकण्याची त्यांची तयारी नव्हती. मिरवणूक पुढे सरकत राहिली. शिरीषकुमारच्या नेतृत्वाखाली बालकांचे ते पथक आपल्या मार्गावर ठाम होते. आणि मग ब्रिटिश पोलिसांनी अमानुष निर्णय घेतला.निरपराध बालकांवर गोळीबार करण्यात आला.

ज्या हातांनी तिरंगा धरला होता, ते हात रक्ताने माखले. ज्या ओठांवर स्वातंत्र्याचा जयघोष होता, त्या कंठांचा आवाज गोळ्यांच्या आवाजात विरून गेला. नंदुरबारच्या भूमीने त्या दिवशी पाच बालकांचे रक्त आपल्या कुशीत घेतले. त्यांचे वय कोवळे होते; पण स्वातंत्र्याविषयीची त्यांची जाणीव प्रगल्भ होती. मृत्यू समोर उभा असतानाही त्यांनी तिरंगा सोडला नाही. स्वातंत्र्याचा जयघोष करीत त्यांनी मृत्यू स्वीकारला.या घटनेची वार्ता नंदुरबारच्या सीमा ओलांडून संपूर्ण देशभर पोहोचली. देशवासीयांच्या मनात या सर्व बालकांविषयी अभिमान निर्माण झाला. स्वातंत्र्यलढ्यातील बलिदानाला वय नसते, हे नंदुरबारच्या या बालकांनी आपल्या रक्ताने सिद्ध केले. हुतात्मा स्मारकाने केवळ पाच बालकांची आठवण जपली नाही; त्याने एका पिढीचा स्वातंत्र्याचा संस्कार पुढच्या पिढीकडे सोपवला.

कारण इतिहास विसरला की केवळ घटना विसरत नाहीत; त्या घटनांनी निर्माण केलेली मूल्येही विसरली जातात.

म्हणून ९ सप्टेंबर हा दिवस नंदुरबारपुरता मर्यादित न राहता संपूर्ण खान्देशात स्मरणाचा आणि प्रबोधनाचा दिवस व्हायला हवा. शाळांमध्ये कार्यक्रम व्हावेत. विद्यार्थ्यांनी त्या ऐतिहासिक मिरवणुकीचा अभ्यास करावा. नंदुरबार, चिमठाणा, रावलापाणी आणि खान्देशातील अन्य स्वातंत्र्यलढ्याच्या स्थळांना जोडणारा ऐतिहासिक प्रवास घडवावा. व्याख्याने, पदयात्रा, प्रदर्शन आणि दस्तऐवजांचे वाचन यांमधून हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवावा.

शिरीषकुमार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तिरंगा खांद्यावर घेऊन दाखवलेला मार्ग आजच्या पिढीने विचारांच्या रूपाने पुढे नेण्याची गरज आहे.त्या बालकांना स्वातंत्र्य हवे होते.आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य अधिक समृद्ध, अधिक न्याय्य आणि अधिक माणुसकीपूर्ण करण्याची जबाबदारी आपली आहे.९ सप्टेंबरच्या या स्मृतिदिनी नंदुरबारच्या त्या पाच बाल हुतात्म्यांना विनम्र अभिवादन!

## शाळांचे सामाजिक लेखापरीक्षणाचा अहवाल शहादा नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना सादर

**शहादा, दि.८(का.प्र.)- व्हिजन शहादा टीमच्या स्कूल ठीक करो या उपक्रमांतर्गत शहादा नगरपरिषदेअंतर्गत येणाऱ्या १४ शाळांचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यात आले. या पाहणीदरम्यान आढळलेल्या अत्यंत गंभीर समस्या, भौतिक सुविधांचा अभाव आणि दुरुस्तीच्या कामांची सद्यस्थिती दर्शवणारा प्राथमिक सविस्तर अहवाल दि.८ सप्टेंबर रोजी शहादा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला.**




झालेल्या प्रत्यक्ष तपासणीत नगरपरिषद शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची असमाधानकारक व्यवस्था, अपुरी सुरक्षा व्यवस्था, मुख्य दरवाजांची दुरवस्था तसेच मुला-मुलींच्या स्वच्छतागृहांची झालेली दैना आणि नियमित स्वच्छतेचा अभाव यांसारख्या गंभीर बाबी समोर आल्या आहेत. अनेक वर्गखोल्यांमध्ये पुरेसे दिवे व पंखे चालू स्थितीत नाहीत, तर सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले सीसीटीव्ही कॅमेरे पूर्णपणे बंद किंवा नादुरुस्त आढळले आहेत. याशिवाय शाळांच्या इमारतींच्या छतांची गळती, प्लास्टर पडणे आणि खिडक्यांच्या काचा फुटलेल्या असणे अशा अनेक त्रुटी पाहणीत स्पष्ट झाल्या आहेत.

अहवालानुसार,नगरपालिका शाळा क्र. १ ही १०० वर्षांपेक्षा जुनी असून सद्यस्थितीत ती वर्ग भरवण्यासाठी अत्यंत धोकादायक आणि जर्जर झाली आहे. त्यामुळे तेथे तात्काळ नवीन इमारत बांधण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. तसेच नगरपालिका शाळा क्र.२,४,१०,११ आणि १६ मध्ये स्वच्छतागृहांची दुरुस्ती, भिंतींचे प्लास्टर, खिडक्यांची दुरुस्ती व रंगरंगोटीची कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क आहे.त्यामुळे या अहवालातील सर्व त्रुटींवर तातडीने कार्यवाही करून शाळांचे मजबुतीकरण, मूलभूत सुविधांची पूर्तता आणि सुरक्षेची योग्य व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी व्हिजन शहादा टीमने केली आहे. या विषयाला अधिक गती मिळण्यासाठी आणि ठोस उपाययोजना व्हाव्यात यासाठी हा सविस्तर अहवाल लवकरच जिल्हाधिकारी, पालकमंत्री, शिक्षणमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याकडेही सादर करण्यात येणार असल्याची माहिती टीमचे विशाल निकम यांनी दिली आहे.

## गुंगीचे घेणाऱ्या तरुणास अटक

धुळे, दि. ७ : शहरातील जामचामळा, शंभर फुटी रोड परिसरात गुंगीच्या औषधी गोळ्यांचे सेवन करणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडले. शाहरुख अब्बास खाटीक (रा. फैजान ए बरकत मशिदीजवळ, चाळीसगाव रोड, धुळे) असे त्याचे नाव आहे. रविवारी (दि.६ सप्टेंबर) सायंकाळी सातच्या सुमारास सार्वजनिक ठिकाणी गुंगीकारक औषधी गोळ्यांचे नशेसाठी त्याने सेवन केले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे हवालदार विवेक वाघमोडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित शाहरुख खाटीक याच्याविरुद्ध चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

## राष्ट्रीय हिंदी दिनानिमित्त राष्ट्रभाषा सभातर्फे निबंध स्पर्धा

धुळे, दि.८- दरवर्षी १४ सप्टेंबर हा राष्ट्रीय हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने यावर्षी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे अंतर्गत महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा धुळे विभागीय कार्यालय हिंदी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरावर, आणि तालुकास्तरावर निबंध स्पर्धा आयोजित करत आहे. सदर निबंध स्पर्धेचे विषय, इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी मेरा प्रिय साहित्यकार आणि इयत्ता आठवी ते दहावी च्या विद्यार्थ्यांसाठी विकसित भारत और हिंदी हे आहेत.

प्रत्येक शाळेने आपल्या स्तरावर ही निबंध स्पर्धा आयोजित करायची आहे, आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे निबंध हिंदी शिक्षकांनी शाळेत जमा करावे, त्यानंतर वरील वरील दोन्ही गटातून आपल्या शालेय स्तरावर उत्कृष्ट असलेल्या निबंधाच्या पहिल्या पानावरील प्रवेशिकेवर प्रथम, व द्वितीय असा शेरा मारावा. त्यानंतर हे दोन्ही प्रथम व द्वितीय विद्यार्थ्यांचे निबंध एका पाकिटात महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा धुळे च्या कार्यालयात, दैनिक आपला महाराष्ट्र च्या मागे वीर सावरकर रोड धुळे बुधवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत कार्यालयाची वेळेत, सोमवार ते शनिवार संध्याकाळी पाच ते सात वाजेपर्यंत जमा करावेत.निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा भवन धुळे येथे होणाऱ्या हिंदी सप्ताहच्या कार्यक्रमात सकाळी १० वाजता केले. हिंदी शिक्षकांनी सदर स्पर्धेमध्ये आपल्या विद्यालयातून पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी या दोन गटातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास प्रेरित करावे असे आवाहन राष्ट्रभाषा सभा धुळे चे अध्यक्ष प्रा. अभिजीत सरोदे, प्रा. डॉ. विश्वास पाटील, सचिव प्रा. डॉ. जसवंतसिंह राजपुत, सदस्य प्रा. डॉ. चंद्रमादेवी पाटील, प्रा. जसपालसिंग सिसोदिया, व केंद्र प्रमुख आनंद कुलकर्णी यांनी केले आहे.

## विद्यार्थ्याचे विषारी औषध प्राशन आश्रमशाळेतील शिक्षकावर गुन्हा

नंदुरबार, दि.८(प्रतिनिधी)- प्रश्नाचे उत्तर देता आले नाही म्हणून शिक्षकाने मारहाण करीत विद्यार्थ्याला उभे राहून पेपर देण्याची शिक्षा दिल्याने विद्यार्थ्याने फवारणीचे औषध प्राशन केल्याची धक्कादायक घटना शहादा तालुक्यातील गणोर आश्रमशाळेत घडली. या प्रकरणी संबंधित शिक्षकाविरुद्ध म्हसावद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहादा तालुक्यातील गणोर आश्रमशाळेत एक विद्यार्थी इयत्ता नववीत शिक्षण घेत आहे. शाळेतील शिक्षक सौरभ वळवी यांनी विद्यार्थ्याला प्रश्न विचारला असता त्याला उत्तर देता आले नाही. त्यामुळे शिक्षकाने विद्यार्थ्याच्या पाठीवर मारहाण करून पेपर उभे राहून देण्यास भाग पाडले.या प्रकारामुळे मानसिक त्रासलेल्या विद्यार्थ्याने गणोर आश्रमशाळेतील अधीक्षक कार्यालयात फवारणीचे औषध प्राशन केले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** मिळकत नं. १ व २ ह्या श्री. उमेशकुमार भैरुलाल टोकशा यांच्या मालकी व कब्जे उपभोगात असलेली शेतजमीन ७/१२ उताराप्रमाणे) तुकडी जिल्हा धुळे तालुका धुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती, धुळे हद्दीतील मौजे पुरमेपाडा येथील पुरमेपाडा शिवारातील मिळकत नं. १ गटनं. १७४/ब/२/अ चे क्षेत्र ०० हेक्टर ३० आर पो. ख. ० हे. ०० आर एकूण क्षेत्र ०० हे. ३० आर आकार रु. ००.३५ पैसे त्याचे वर्णन व क्षेत्र चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : गट नं. १७५/अ/२ पश्चिमेस : मुंबई आग्रा रोड,
दक्षिणेस : गट नं. १७४/ब/१ उत्तरेस: गट नं. १७४/१/अ/१

तसेच मिळकत नं. २ गट नं. १७५/अ/२ चे क्षेत्र ०० हेक्टर ९५ आर. पो. ख.० हे. ०० आर. एकूण क्षेत्र ०० हे. ९५ आर आकार रु. ०१.२० पैसे त्याचे वर्णन व क्षेत्र चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : नाला पश्चिमेस : गट नं. १७४/ अ/२/अ
दक्षिणेस : गट नं. १७४/ब/१ उत्तरेस : गट नं. १७४/१/अ/१

येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील मिळकती ह्या हल्ली कब्जेदार व मालक श्री. उमेशकुमार भैरुलाल टोकशा राहणार नाशिक यांच्या असून यांनी वरील दोन्ही मिळकतीचा विक्रीचा सौदा आमचे अशिल श्री. कोमलसिंग धरमसिंग पाटील व सौ. सरला कोमलसिंग पाटील यांचेशी केलेला आहे. त्यांनी आमचे अशिलकडून बयाणापोटी रक्कम देखील स्विकारलेली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचे काही हक्क, अधिकार, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदापावती, बोजा, मुखत्यारपत्र इतर काही हक्क, संबंध, लीज, गहाण, तारण, मे. कोर्टाचा मनाई हुकूम, कुठल्याही प्रकारची खरेदी विक्री कुळ व अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार अगर तकार असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासोबत सदर आपली लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आंत खालील दिलेल्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष येवून दाखवावे. मुदतीत न आलेल्या हरकती तसेच परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती आमच्या अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिल वरील मिळकती संदर्भात खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमच्या अशिलाने दिलेल्या माहिती व दाखविलेले कागदपत्र व सांगितलेवरुन त्यांच्यातर्फे आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे, दि. १०/०९/२०२६.

**ॲड.डी.के.पाटील,**
पत्ता : गाळा नं. पहिला मजला, हिरेभवन, पाटील झेरॉक्सच्या बाजूला, जिल्हा न्यायालयासमोर, धुळे ४२४००१



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे काळखेडे ता.जि. धुळे येथील गट क्रमांक व उपविभाग २७२/१/अ/३/१ चे क्षेत्र ० हे ४८ आर, व पो.ख.०० हे १२ आर असे एकूण क्षेत्र ० हे ६० आर चा आकार ० रु. ०९ पैसे अश्या वर्णनाची ची बागायत शेतजिमन मिळकत यास जुन्या वहिवाटी प्रमाणे कायमस्वरूपी वापर रस्ता आहे व राहिल.

यासी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील मिळकत ही १) श्री.त्र्यंबक अंबर पाटील २) श्री.हिलाल अंबर पाटील दोघेही रा.काळखेडे ता.जि.धुळे यांच्या संयुक्त मालकीच्या व ताबेउपभोगातील असून यांच्या कडून सदर मिळकतीं या आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करून खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज, निर्वेध व वरील नमूद मालकांच्या संयुक्त मालकीची व ताबेउपभोगातील असल्याचे गृहीत धरून खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दि.०९/०९/२०२६.
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवालाबिल्डींग जवळ, मिलपरीसर, धुळे.
**मो.नं.९४२२७७१२७४**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे कावठी ता.जि.धुळे येथील गट क्रमांक व उपविभाग १९३/१/अ चे क्षेत्र ०१ हे ४८ आर, व पो.ख.०० हे.५० आर असे एकूण क्षेत्र ०१ हे ९८ आर चा आकार २ रु.०० पैसे अश्या वर्णनाची भोगवटादार वर्ग २ ची जिरायत शेतजिमन मिळकत यास जुन्या वहिवाटी प्रमाणे कायमस्वरूपी वापर रस्ता आहे व राहिल.

**यासी** **चतु:सिमा**
पुर्वेस- महामार्ग,
पश्चिमेस- गट नं.१७७ व १७८,
दक्षिणेस- गट क्रं.१९३/२/अ,
उत्तरेस- नाला व गट नं.१९४

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील मिळकत ही तुकडु यासीन ऊर्फ मासीन पिंजारी रा.मेहेरगांवता, जि.धुळे यांच्या मालकीच्या व ताबेउपभोगातील असून यांच्याकडून सदर मिळकतीं या आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदरची मिळकज ही निर्बोज, निर्वेध व तुकडु यासीन ऊर्फ मासीन पिंजारी रा. मेहेरगांवता.जि.धुळे यांच्या मालकीच्या व ताबेउपभोगातील असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.०९/०९/२०२६.
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवालाबिल्डींग जवळ, मिलपरीसर, धुळे.
**मो.नं.९४२२७७१२७४**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो.तु. जि. धुळे मौजे महिंदळे ता.जि. धुळे धुळे मनपा वाढीव हद्दीतील स.क्र. १०३/७ पैकी प्लॉट नं. १४ चे क्षेत्र २१७ चौ. मी. व बखळ प्लॉट त्यांसी चतु:सिमा पुर्वेस स.नं. १०३/६, पश्चिमेस : प्लॉट नं. १५, दक्षिणेस : प्लॉट नं. १६, उत्तरेस : रस्ता अशा मिळकत ही श्री. गुणेशचंद्र सुरेशचंद्र सोनवणे रा.जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर धुळे ता. जि. धुळे यांचे नावे व ताबे उपभोगातील आहेत.

येणे प्रमाणे वर्णनाचे मिळकती आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा श्री. गुणेशचंद्र सुरेशचंद्र सोनवणे यांचेशी केलेला असून त्यांना बयाणापोटी रक्कम देखील दिलेली आहे. आमचे अशिल हे लवकरच नोंदणीकृत व्यवहार करणार आहेत.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचा गहाण, सौदा, खरेदी, विक्री,कर्ज तथा संच बोझा आदी कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत सदर हरकत,हक्क, अधिकार अथवा हितसंबंध बाबतचा लेखी पुरावा आमच्याकडे खालील पत्त्यावर स्वत: समक्ष येवून, आणून देवून त्याची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्बोज, निर्वेध आहे.असे समजून सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्यानंतर सदर बाबतीत आलेली कोणतीही हरकत आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही व खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आमचे अशिलाचे सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे दि. ०९/०९/२०२६

**ॲड. चंद्रशेखर आर. तेले**
१४ रामदास नगर, साक्री रोड, महिंदळे शिवार, धुळे, ता. जि. धुळे
मो. ७५८८३१९९२०



**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS
**AYESHA SIDDIQUA SHAIKH FATTU**
MY NEW NAME IS
**AAYESHA SIDDIQA SHAIKH HASHIM HUSAIN**
ADD- PLOT NO.29, NEAR MASJID ALI MUSTUFA, BORSE COLONY, DHULE.

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS
**SHAIKH MUMTAJ BI MAJID**
MY NEW NAME IS
**MUMTAJ BI ABDUL MAJID SHAIKH**
ADD- PLOT NO.13A, NEAR NATIONAL URDU HIGH SCHOOL, MANIYAR SOCIETY, DHULE-424001.

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS
**HASHIM HUSAIN MOHAMMAD HANEEF**
MY NEW NAME IS
**HASHIM HUSAIN MOHAMMAD HANIF SHAIKH**
ADD- VADJAI ROAD, HAJRAT ALI MUSTUFA MASJID KE PASS, BORESE COLONY, DHULE.

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS
**SHAIKH MAQSOOD ABDUL MAJEED**
MY NEW NAME IS
**SHAIKH ABDUL MAQSOOD ABDUL MAJID**
ADD- PLOT NO.13A, NEAR NATIONAL URDU HIGH SCHOOL, MANIYAR SOCIETY, DHULE-424001.


## फागण्यात आत्महत्या

धुळे, दि. ७ : फागणे (ता. धुळे) येथील शालीग्राम सुदाम पाटील (वय ४३, रा. इंदिरा नगर) यांनी घरातच छताला गळफास घेतला. रविवारी (ता. ६) दुपारी साडेतीनच्या सुमारास घटना निदर्शनास आली. धुळे तालुका पोलिसा ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. घटनेमाचे नेमके कारण समजू शकले नाही, पोलीस तपास करीत आहेत.


TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता.०५ से रोज ४ खेल टा. १२,३,६,९ बजे
हनुमान अंश (हिंदी)
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

प्रकाश में आज दुश्मनी




सनीदेअल जैकी श्रॉफ मनिषा कोइराला दीप्ति नवल अनुपम खेर रघुवीर


### शब्दकोडे क्रमांक : २४४९



**आडवे शब्द :** १.मंडी ३.युवा पिढी ६.आश्चर्य ९.ज्वर १०.शह ११.गीज-उलट लिहा १२.निळसर रंगाचे १४.काहीही न बोलता केले जाणारे व्रत १६.दुरावस्था १७.मागून केलेली निंदा १९.वचन २०.मुख २२.पुरुष २३.निर्मिती २४.झाडाचे मूळ २५.फल २६.विशेष २९.खूप ३१.प्रतिक्रिया ३३.छापलेली ३६.एक रंग ३९.एक जगप्रसिद्ध लिपी ४१.पैसा ४२.संस्मरणीय ४४.साल ४५.धोबी ४७.दीन ४८.सर्प ४९.पंख,नात्यात नसलेला ५०.समय ५१.कंबर ५३.हिंदीत-शंभर ५४.हिंदीत-चिंच ५५.नृत्य ५६.नाही-इंग्रजीत **उभे शब्द :** १.लहान मुलं २.उपवासाच्या दिवशी खातात ते कंदमूळ ४.रशिया ५.प्रामाणिकपणा ७.निगा ८.दागील-उलट लिहा १२.संगीतमय ध्वनी,मुलाचे एक नाव १३.प्रियकर १४.मस्ती १५.पात्रातील मुख्य मजकूर १६.नशीब १८.मुस्लिम स्त्रिया परिधान करतात तो पोशाख १९.मनन २१.द्वेष २७.नेहमी २८.महाराष्ट्राला खेटून असलेले एक गुजरात राज्यातील शहर ३०.पाण्याचा हौद वा पिंप ३२.ठाणेदार-हिंदीत ३३.सुंदर ३४.विवाह ३५.उपकरण ३७.रेलवे रूळ-हिंदीत ३८.एक मुलीचे नाव ४०.मनावरील उदासी ४३.दहा ४४,शिकवण ४५.एक फळ ४६.डोक्यावर मारलेली टिचकी ५०.बगल ५२.महत्वाची नोंद वा बातमी

**शब्दकोडे क्रमांक : २४४८ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | फ | ल | | सा | म | ना | | नों | | व | ग |
| र | | ट | र | फ | ल | | का | द | र | खा | न |
| दा | र | | वा | | ई | म | ली | | स | र | |
| र | | क | ळ | प | | ती | | बा | र | | अ |
| | का | ल | | ट | प | | बु | र | शी | ज | न्य |
| फि | | म | ज | ल | | पा | ट | | त | वा | |
| क | डा | | न | | सा | व | का | र | | ब | डा |
| ट | | को | | च | क | ली | | य | स | | व |
| | पा | ळ | ता | | व | | जा | त | | टो | पे |
| बा | र | सा | | का | | टा | य | | प्र | | ज |
| व | स | | प्र | ल | य | | बं | दी | वा | स | |
| टा | | फ | त | वा | | नां | दी | | स | न | ई |

पान १ वरुन

## दुष्काळी स्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या

ओबीसी आणि इतर वंचित समाजांना बसू शकतो. संविधानाच्या पलीकडे जाऊन मागण्या होत असतील तर त्या संदर्भात सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी. मात्र, सरकार सध्या संदिग्ध भूमिका घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**ओबीसींसाठी सरकारने काय केले?**

ओबीसी समाजाला सरकारने आतापर्यंत किती न्याय दिला, असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजाचे आरक्षण आणि हक्क अबाधित राहतील, याची हमी सरकारने द्यावी. मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनामुळे सरकारवर दबाव निर्माण झाला असून सरकारला आपली भूमिका बदलावी लागत असल्याचा दावा त्यांनी केला.

**पेपरफुटीवरही सरकारला प्रश्न**

एमपीएससीच्या पेपरफुटी आणि परीक्षा प्रक्रियेतील कथित गोंधळावरूनही वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधला. एमपीएससीच्या गैरकारभाराच्या प्रकरणात तत्कालीन अध्यक्ष डॉ. अभय वाघ यांच्यावर गंभीर आरोप झाले आहेत. या प्रकरणात त्यांची भूमिका काय होती, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. यापुर्वी २००२ मधील पेपरफुटी प्रकरणात तत्कालीन अध्यक्ष शशिकांत कर्णिक यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. त्याच धर्तीवर डॉ. अभय वाघ यांचीही चौकशी होणार आहे की सरकार त्यांना पाठीशी घालणार आहे, असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. ओबीसी आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर सरकार अपयशी ठरल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी केला. बिंदूनामावलीतील बदलामुळे आदिवासी समाजाच्या रोजगार आणि इतर संधींवर परिणाम होत असल्याचा दावा त्यांनी केला. आदिवासी समाजाला मिळणाऱ्या संधी कमी केल्या जात असतील तर काँग्रेस त्याला ठामपणे विरोध करेल. ओबीसी आणि आदिवासी समाजाच्या या प्रश्नांसह शेतकऱ्यांच्या समस्याही राज्यपालांसमोर मांडणार असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

## एमपीएससीची विद्यार्थ्याची पुण्यात आत्महत्या

केले आहे. आता प्रथमेशच्या मृत्यूनंतर पेपरफुटी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक आणि मानसिक तणावाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

**अध्यक्ष-सचिवांचा राजीनामा हवा**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेवरून सरकारवर जोरदार टीका केली आहे. पेपरफुटीच्या प्रश्नावर सरकार जबाबदारी झटकत असल्याचा आरोप करत त्यांनी एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिव यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. पेपरफुट आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांनी एमपीएससीच्या अध्यक्षांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणीही सपकाळ यांनी केली. प्रथमेशच्या मृत्यूला सरकारला जबाबदार धरत, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

**विद्यार्थ्यांना भावनिक आवाहन**

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनीही प्रथमेश देशमुख यांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त करत सरकारवर टीका केली. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातून पुण्यासारख्या शहरात स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, शिक्षणाचा खर्च आणि परीक्षांमधील अनिश्चितता यांचा सामना करावा लागतो. अशा विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे दिपके यांनी म्हटले. दरम्यान, प्रथमेश देशमुख यांच्या मृत्यूमागील नेमकी कारणे काय होती, याचा तपास सुरू असून पेपरफुटीशी या घटनेचा थेट संबंध होता का, याबाबत अधिकृतपणे स्पष्टता झालेली नाही.

## हिरे वैदयकीय महाविद्यालय व जिल्हा रूग्णालयात

आलेले नाही. रूग्णालयाने दिव्यांगांना दोन ते तीन महिन्यांपासून अपंगत्वाचे प्रमाणपत्र वाटप केले नाही. रूग्णालयातील एक्स-रे मशीन बंद आहे. सीटी स्कॅन, एमआरआय मशिन मंजूर होवूनही रूग्णालयात उपलब्ध करण्यात आलेले नाही. जिल्हा रूग्णालयातील सीटीस्कॅन मशीनही वारंवार बंद असते. नवजात अर्भक, बालसंगोपन विभागात उपचाराची योग्य सुविधा उपलब्ध नाही. व्हेंटीलेटर एकच असल्याने बालकांच्या जीवीताचा धोका वाढला आहे.

रूग्णालय प्रशासनाने सर्व लॅब चाचण्या मोफत कराव्यात. नाक, कान व घसा विभागातील मशीन सुरू करावे, सीटी स्कॅन व एमआरआय मशीन उपलब्ध करून द्यावे. बालकांच्या विभागात व्हेंटीलेटरची तात्काळ व्यवस्था करावी. पंधरा दिवसांत मागण्यांची पूर्तता न झाल्यास हिरे वैद्यकीय महाविद्यालयासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भिक्षा मांगो आंदोलन करण्यात येईल. असा इशारा काँग्रेसचे अमीन पटेल, अबुलास खान, असलम सिराज, खलील मेहंदी हसन, आसीफ अन्सारी, वसीम सरदार, रईस काझी, मुजाहिद अन्सारी, कुर्बान अन्सारी, सरबर अन्सारी, नवीद अन्सारी, आसीफ मसालेवाले यांनी दिला आहे.

## पालकमंत्री हसन मुश्रीफ नंदुरबार जिल्हा दौऱ्यावर

आढावा बैठक तसेच जिल्हा क्रीडा संकुल येथील प्रशासकीय कार्यालयाचे ऑनलाइन उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल. सकाळी १०.३० वाजता रंगावली सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय,नंदुरबार येथे पत्रकार परिषद. सकाळी ११.०० वाजता शासकीय विश्रामगृह, नंदुरबार येथून (शहादा -म्हसावद- राणीपूरमार्गे ) तोरणमाळ ता.धडगावकडे प्रयाण करतील. दुपारी १.०० वाजता तोरणमाळ येथे शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव.

दुपारी ३.०० वाजता शासकीय विश्रामगृह, तोरणमाळ ता.धडगाव येथे विविध पर्यटन स्थळांची पाहणी व तोरणमाळ पर्यटन विकास आराखडा सादरीकरण. दुपारी ४.०० वाजता तोरणमाळ, ता.धडगाव येथून(राणीपूर -म्हसावद-शहादा मार्गे) तळोदाकडे प्रयाण. सायंकाळी ०५-०० वाजता तहसिल कार्यालय, तळोदा येथे तळोदा तालुका विविध शासकीय विभागाच्या विकास योजनांचा आढावा बैठक. सायंकाळी ६.३० वाजता तळोदा येथून शासकीय विश्रामगृह, नंदुरबारकडे प्रयाण. रात्री ८.४५ वाजता खान्देश एक्सप्रेसने नंदुरबार रेल्वे टर्मिनस येथून दादरकडे प्रयाण करतील.

## सकल मराठा समाजातर्फे ना.विखे पाटलांच्या

आंदोलनामुळे संतोषी माता चौक येथे मोठ्या प्रमाणात ट्राफिक जाम होवून चारही दिशांना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळेस पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मराठा आंदोलकांना ताब्यात घेतले व वाहतुक सुरळीत केली.

या रास्ता रोको आंदोलनावेळी सकल मराठा समाज, धुळे चे भानुदास बगदे, विनोद जगताप, भैय्या शिंदे, माजी आमदार प्रा. शरद पाटील, आबा कदम, राजेंद्र काळे, हेमंत भडक, उल्हास यादव, रणजित भोसले, गोविंद वाघ, विजय मराठे, संतोष लकडे, श्रीरंग जाधव, उल्हास पाटील, बबलू बागुल, वामन मोहिते, वीरेंद्र मोरे, जितू इखे, संदीप सूर्यवंशी, जितू घोरपडे, ॲड. दिनेश काळे, विक्रम काळे, बाळासाहेब ठोंबरे, मनोज ढवळे, जगन ताकटे, प्रफुल्ल माने, वसंत हरळ, वैभव पाटील, नैनेश साळुंखे, अमर फरताडे, संदीप चव्हाण, राकेश भोसले, सुरेश पवार, सुनील वर्षे, भानुदास चौधरी, प्रभाकर वाघ, सोबत काळे,शरद मराठे, सुनिल बर्गे, श्याम रायगुडे यांच्यासह मोठ्या प्रमाणात मराठा समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रीती मोरेंना तापी-पूर्णा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

येथे होणार आहे. या संमेलनात प्रदान करण्यात येणाऱ्या तापी-पूर्णा राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी दि.२२ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत केली. यामध्ये सौ. प्रीती मोरे यांची त्यांच्या वक्तृत्व व निवेदन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे तापी-पूर्णा राष्ट्रीय उत्कृष्ट वक्ता/निवेदक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.सौ. प्रीती मोरे या साहित्य, वक्तृत्व, निवेदन व सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या धुळे जिल्हा उपाध्यक्ष, तसेच सकल भारतीय सोनार समाज संघटनेच्या सहसंस्थापक आणि सकल भारतीय सोनार समुपदेशन समितीच्या सदस्या आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाल्याने जिल्ह्यासह साहित्य, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

पान १ वरुन

## महिलांनी समुपदेशन केंद्राचा लाभ घ्यावा

समुपदेशन केंद्रामार्फत कौटुंबिक हिंसाचार, मानसिक त्रास तसेच इतर संकटात असलेल्या महिला व मुलींना मोफत समुपदेशन सेवा पुरविण्याबरोबरच पोलिस मदत, कायदेशीर मार्गदर्शन तसेच आवश्यकतेनुसार निवारा बाबत सहाय्य केले जाणार आहे. भेट देणाऱ्या महिलांची ओळख किंवा नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाणार असून संकटग्रस्त महिलांनी न घाबरता समुपदेशन केंद्राशी संपर्क साधावा. सद्यस्थित जूने पोलिस स्टेशन आवार, प्रांताधिकारी कार्यालय पाठीमागे शहादा येथे समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाले असून समुपदेशन केंद्राचा लाभ घ्यावा तसेच ९६०४२५२०५० या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन समुपदेशक आरती शिंदे व अर्चना पावरा यांनी केले आहे.

## शहाद्यात शहीद लालदास देसाई

बालशहिदांनी प्राणांचे मोल देऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. हे स्वातंत्र्य अबाधित राखणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून शहिदांचे स्मरण करून देशभक्तीची भावना सदैव जागृत ठेवली पाहिजे.अभिवादन कार्यक्रमास राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष प्रा. आर. टी. पाटील, ज्येष्ठ साहित्यिक व सेवा निवृत्त प्राचार्य डॉ. विश्वासराव पाटील, भाजपा ज्येष्ठ नेते डॉ. कांतीलाल टाटिया, शहादा नगरपालिकेचे मुख्याधिकारी साजिद पिंजारी, सुप्रसिद्ध सर्जन डॉ. बी.डी. पाटील, बांधकाम सभापती संतोष वाल्हे, जायंट्स फेडरेशनच्या ड. संगीता पाटील, सामाजिक कार्यकर्ते जयेश देसाई, शिवसेना शहर प्रमुख जितेंद्र जमदाळे, संकल्प ग्रुपचे माजी अध्यक्ष सुरेश चव्हाण, नगरसेवक कल्पेश पटेल, भाजपाचे विनोद जैन, नगरसेविका भारती चव्हाण, कैलास भावसार, प्रा. लियाकत अली सैय्यद, प्रवासी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर पाटील, कार्य पर्यवेक्षक दिलीप वसावे, सहाय्यक नगररचनाकार अभिषेक चत्रे, चेतन गांगुर्डे, सहाय्यक कर निरीक्षक चौधरी, विनय माळी, जिज्ञासा जावरे, गोटूलाल तावडे, रवींद्र पाटील, निंम्बा बडे, खलील शेख, सागर पाटील, जितेंद्र साळी, बापू चौधरी, माजी प्राचार्य डॉ. खलील शहा यांसह विविध संस्थांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे औचित्य साधून शहादा नगरपालिका प्रशासनातर्फे शहरातील सर्व शहीद स्मारकांची स्वच्छता करण्यात आली होती. या स्वच्छता मोहिमेत पालिकेचे चेतन गांगुर्डे यांनी विशेष योगदान दिले.

## नंदुरबारला ना.उदय सामंतांच्या उपस्थितीत

नंदुरबार येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत जिल्ह्यातील औद्योगिक संघटना, गुंतवणूकदार, उद्योजक, निर्यातदार तसेच विविध शासकीय यंत्रणांच्या सोबत उद्योग क्षेत्राच्या विकासासंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय गुंतवणूकदार परिषद २०२६ च्या माध्यमातून जिल्ह्यातील गुंतवणूकदार व व्यावसायिकांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे, अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करणे, उद्योगांच्या विस्ताराला गती देणे तसेच रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे हा परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

जिल्ह्यातील उद्योजक, गुंतवणूकदार, निर्यातदार, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच उद्योजकांनी या जिल्हास्तरीय गुंतवणूकदार परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा) तथा जिल्हा उद्योग केंद्र, निलेश गायकवाड यांनी केले आहे.

## नगरसेविकेच्या मुलावर हल्ला करणाऱ्या

करणारे दोन्ही गट भाजप या पक्षातीलच असून दोन गटातील आपसातील वादातून ही घटना घडली. याप्रकरणी उशिराने का होईना अखेर गुन्हा दाखल झाला. मारहाण करणाऱ्यांपैकी काहींनी गावठी कट्टा, चाकू सुरा सारखी तिक्ष्ण हत्यारे सर्रास वापरली. त्यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. शहरातही या घटनेविषयी राजकीय तर्कवितर्क लावले जात असून उलट सुलट चर्चा सुरू आहेत. गाडी नीट चालवता येत नाही का, असे विचारल्यावरून वाद झाल्याचे पोलिस चौकशीत आढळले, परंतु नेमके कारण हेच आहे की दुसरे असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

## ज्वारीच्या शेतातील त्र्याणव लाखांचा गांजा

शोएब शेख, सचिन सैंदाणे व भरत उगले यांच्या पथकाने केली. अंमली पदार्थांची लागवड, वाहतूक व विक्रीविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

पान १ वरुन

## कर्णकर्कश डीजे आणि तीव्र लेझर लाईट्स

झटके येण्याचा धोका संभवतो. डीजे व मोठ्या आवाजाच्या स्पीकरपासून शक्य तितके अंतर ठेवा. लहान मुलांना स्पीकरच्या अगदी जवळ उभे करू नका. मोठ्या आवाजाच्या ठिकाणी जास्त वेळ थांबणे टाळा.लेझर किरणांकडे थेट पाहू नये. लेझरचा प्रकाश डोळ्यांवर पडल्यानंतर दृष्टी धूसर किंवा कमी झाल्याचे जाणवल्यास तात्काळ नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आयोजकांनी ध्वनीची तीव्रता व लेझरचा वापर करताना सार्वजनिक सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे आणि सर्व शासकीय नियमांचे काटेकोर पालन करावे.मात्र अतितीव्र आवाजामुळे होणारा श्रवणदोष आणि लेझरमुळे होणारी डोळ्यांची इजा कायमस्वरूपी असू शकते. त्यामुळे सण-उत्सव साजरे करताना आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. असे आवाहने डॉ. संतोष कुळकर्णी (राज्य अध्यक्ष), डॉ. विक्रांत देसाई (राज्य सचिव), डॉ. अमोल गित्ते (राज्य खजिनदार), महाराष्ट्र राज्य. यांनी केले आहे.

# शिवसेना धुळे महानगर प्रमुखपदी धिरज पाटील, तेजस गोटेंची नियुक्ती

**धुळे, दि.९- शिवसेना पक्ष प्रफुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना नेते संजयजी राऊत, उत्तर महाराष्ट्र समन्वयक रविंद्र मिर्लेकर, संपर्क प्रमुख अशोक धात्रक, माजी आमदार अनिल गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे महानगरप्रमुख पदी धिरज काशिनाथ पाटील व तेजस अनिल गोटे या दोघांची नेमणुक करण्यात आली आहे.**

जिल्हा समन्वयकपदी डॉ.अनिल पाटील तर शहर संघटकपदी आनंद जावडेकर यांची नेमणुक करण्यात आली असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, निंबा मराठे, भरत मोरे, संदिप सूर्यवंशी, शेखर वाघ, अण्णा फुलपगारे, शिवाजी शिरसाळे, प्रशांत ठाकूर, डॉ.अनिल पाटील, राजेंद्र ढवळे, सुनील पाटील, जवाहर पाटील, भूषण पाटील, दिलीप चित्ते, मुन्ना पठाण, सुभाष मराठे, संजय पाटील, दिनेश पाटील, अनिल चौधरी यांनी अभिनंदन केले आहे.

**पाहिजेत**

मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.

-:संपर्क:-

9881118707

234494/237494

### निधन वार्ता

## राजू कंडारे



धुळे, दि.९- येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवृत्त कर्मचारी राजु दौलत कंडारे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षांचे होते. प्लॉट क्रमांक ३४, श्रीकृष्ण नगर, चितोड, धुळे येथील निवासस्थानापासून आज दि.१० सप्टेंबर रोजी सकाळी अकराला त्यांची अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे. त्यांच्या मागे पत्नी किरणबाई राजू कंडारे, हिरे वैद्यकीय महाविद्यालय सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील कर्मचारी संदीप कंडारे, महापालिकेतील कर्मचारी कुणाल कंडारे, नितीन कंडारे यांचे ते वडील होत.

पान १ वरुन

## रुग्णसेवेत औषधे, स्वच्छता, दर्जेदार आहाराला

अधिष्ठाता डॉ. अजित पाठक, प्रांताधिकारी रोहन कुवर, तहसीलदार अरुण शेवाळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकरम खान, प्रशासकीय अधिकारी श्रीमती संध्या चौधरी, डॉ. निता हटकर, डॉ. अरुण नागे, डॉ. पौर्णिमा नागे, डॉ. अरुण मोरे, प्रांत अधिकारी रोहन कुवर तसेच तहसीलदार अरुण शेवाळे यांच्यासह डॉक्टर,परिचारिका व संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी अपघात विभाग, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग, बालरोग विभाग, बालरोग अतिदक्षता विभाग तसेच आहार पॅन्ट्री विभागाला भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी उपस्थित डॉक्टर, परिचारिका, कक्षसेवक यांच्यासह रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी थेट संवाद साधूनरुग्णालयातील सेवांबाबत माहिती घेतली. रुग्णांना औषधे वेळेवर मिळतात का, आहार वेळेवर दिला जातो का, बेडशीटची नियमित स्वच्छता केली जातेका, तसेच कोणतीही औषधे बाहेरून खरेदी करण्यासाठी लिहून दिली जात नाहीत ना, याबाबत जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून प्रत्यक्ष विचारपूस करून खात्री केली. रुग्णालयात आवश्यक औषधांचा पुरेसा साठा कायम उपलब्ध ठेवावा आणि औषधांअभावी कोणत्याही रुग्णाची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

रुग्णांच्या आवश्यक सर्व चाचण्या रुग्णालयातच वेळेत करण्याची व्यवस्था करावी. रुग्णालयातील कक्ष,बेडशीट, परिसर आणि विशेषतः स्वच्छतागृहांची नियमित व काटेकोर स्वच्छता राखावी. रुग्णसेवेशी संबंधित प्रत्येक बाबीवर नियमित लक्ष ठेवून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना उपचारादरम्यान कोणतीही अनावश्यक अडचण येणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले. रुग्णसेवा अधिक संवेदनशील, दर्जेदार आणि रुग्णाभिमुख करण्यासाठी डॉक्टर, परिचारिका तसेच सर्व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी सांगितले. औषधांची उपलब्धता, रुग्णांच्या चाचण्या, स्वच्छता आणि दर्जेदार आहारासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्यानिर्देशांचे पालन करून आवश्यक कार्यवाही करण्यात येत असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशीही स्वतंत्रपणे संवाद साधण्याची इच्छा जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी व्यक्त केली. त्यानुसार आगामी काळात वैद्यकीय विद्यार्थ्यांशी त्यांचा थेट संवाद घडवून आणण्यात येणार असून विद्यार्थ्यांचे शिक्षण, प्रशिक्षण, उपलब्ध सुविधा तसेच त्यांच्या अपेक्षांबाबत सुसंवाद साधण्यात येणार आहे.

## टोल प्लाजा प्रशासन टोल वसुलीत मग्न

उतरवताना किंवा बाजूला घेताना चालकांचे नियंत्रण सुटून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या साईड पट्ट्या तात्काळ भरणे गरजेचे आहे. याशिवाय, दोन्ही बाजूंचे सर्विस रस्ते ठिकठिकाणी उखडले असून त्यांची तातडीने पुनर्रचना आणि दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.टोल प्लाझा प्रशासन केवळ वाहनधारकांकडून टोल वसूल करण्यात मग्न असून रस्त्यांच्या मूलभूत सुविधा आणि सुरक्षेकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करत असल्याचा संताप नागरिकांतून व्यक्त होत आहे. जर टोल कंपनीने आणि संबंधित विभागाने तात्काळ या ड्रेनेजचे खड्डे बुजवून सर्विस रस्त्यांची दुरुस्ती केली नाही, तर होणाऱ्या अपघातास सर्वस्वी टोल प्रशासनच जबाबदार राहील, असा इशारा स्थानिक ग्रामस्थ व वाहनधारकांनी दिला आहे.

जागा भाड्याने देणे आहे



खोलगल्ली भगवा चौक, कस्तुरबा गांधी रोड, कमल पुस्तकालय समोरील पहिला मजला

सर्व सोयींनी युक्त ६२५ स्क्वेअर फुट जागा

ऑफिस, डॉक्टर, लॅब यांना भाड्याने देणे आहे

योग्य आहे: ऑफिस डॉक्टर लॅब

वैशिष्ट्ये:
- ६२५ चौ.फूट प्रशस्त जागा
- • २४/७ पाणी व वीज सुविधा
- पार्किंग उपलब्ध
- स्वच्छ व सुरक्षित परिसर

संपर्क : श्री. सतीश साठये

मो. नं. ९८२२३५७७०७

भाड्याने देण्यासाठी उपलब्ध | पहिल्या मजल्यावर | लगेच उपलब्ध

तात्काळ संपर्क साधा | स्वच्छ, सुरक्षित, व्यावसायिक जागा

**पाहिजेत पाहीजेत**

**विवेकानंद डोळ्यांचे हॉस्पीटल,जयहिंद कॉलेज रोड, धुळे च्या विविध सामाजिक उपक्रमा साठी पूर्ण वेळ/पार्ट टाईम मानधन/पगारावर असणारी पदे**

1. व्यवस्थापक (Manager) गोंदूर येथील प्रस्तावित सर्व धर्म स्थळासाठी, देवपूर हॉस्पिटल साठी, आरोग्य शिबिरे आयोजन
2. वाहन चालक(Driver)
3. कमवा आणि शिका - भारत समाज संघ च्या Hospital Managment,optician,optometry,OT Assistant सारख्या 100% रोजगाराभिमुख कोर्सेस विनामूल्य/ नाममात्र शुल्क
4. दृष्टी स्वयंसेवक/ आरोग्य रक्षक- मानधनावर
5. चौकीदार Security

श्रम, वेळ, अनुभव,निष्ठा, क्षमता,उत्पन्नावर आधारित उत्कृष्ट पगार

संपर्क- डॉ राधेश्याम रोडा

9511890155,7588102864

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



शंकर विजय सॉ मिल

प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे

फो. 9595397718, 9665886722

*धुळे, दि.९- शहरात सर्वच वर्दळीच्या रस्त्यावर मोकाट जनावरांचे समुह बसलेले असल्याने रहदारीला अडथळा निर्माण होतो आहे. मोकाट जनावरांचा प्रश्न तातडीने सोडवावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

गणपती बाप्पा मोरया

बाप्पाच्या आवडीचे मोदक

फक्त मदर्स किचनमध्येच

१) उकडीचे मोदक
२) ओल्या नारळाचे तळणीचे मोदक
३) गौरी फराळ (अनारसे, करंजी, चकली, चिरोटे). नोंदणी आवश्यक

मदर्स किचन

फुलवाला चौक धुळे.

9049902201

7887750864

Godrej

27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट

BAJAJ FINSERV

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

फायनान्सला लागणारी कागदपत्रे

1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक

नियम व अटी लागू*

ak media- 238222

59 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

**पाहिजेत**

लॉजिंग कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा पाहिजे.

आकर्षक पगार दिला जाईल.

-:समक्ष भेटा:-

राजेंद्र लॉज

ग. नं. २, धुळे

**माणुस लावणे आहे**

भाग्यश्री कृषी सेवा केंद्र, धुळे

-:संपर्क:-

पारोळा रोड, प्रकाश टाकीज समोर, धुळे

9423135555

**प्लॉट विकणे आहे**

महिंदळे शिवार येथील स.नं. १०६/१ अ १/ पैकी प्लॉट नं. ४२ क्षे. १९९० चौ. फुट बखळ प्लॉट विकणे आहे.

-:संपर्क:-

लता विश्वास कुवर

9850415576

7972369619

**पाहिजेत**

१) प्रिटींग मशिन हेल्पर
२) ग्राफिक डिझायनर

सुयोग डिजीटल प्रिंटर्स

श्रीराम कॉम्प्लेक्स, पॉवर हाऊसजवळ, साक्रीरोड, धुळे.

मो.8087524209

**पाहिजेत**

होलसेल मेडिकल दुकानासाठी

१) कॉम्प्युटर ऑपरेटर (महिला)– जागा २
२) हेल्पर – जागा १
३) सेल्समन– जागा २

-: समक्ष भेटा :-

श्री साई फार्मा

ग.नं.५, धुळे.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०